# माथेरान वाचवण्यासाठी आर्किटेक्ट्सचा पुढाकार

**योगेश मेहेंदळे**

शहरातल्या धकाधकीपासून विरंगुळ्याचे चार क्षण मिळवण्यासाठी माथेरान, महाबळेश्वरसारख्या हिलस्टेशन्सना भेटी देणाऱ्या शहरवासियांचं प्रमाण वाढत असल्याने, आता किमान हिलस्टेशन तरी आता वाचवू या, असा संदेश इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट या संस्थेने दिला आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट (आयआयए)च्या कल्याण शाखेने माथेरानमध्ये आर्किटेक्चर कॉलेजच्या माध्यमातून हिलस्टेशन्सचे सर्व्हे करायचे, सरोवरांसारखी ठिकाणं निवडून विकासाचं काम सुरू करायचं, राज्य सरकार, केंद्र सरकार व अशासकीय संस्थांच्या माध्यमातून विकासाच्या योजनांचा पाठपुरावा करायचा, असे निर्णय या परिषदेत घेण्यात आले.

या परिषदेमध्ये संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ दळवी, रचना संसदचे संस्थापक सदस्य सुमंत वांद्रेकर, प्रकाश देशमुख, पल्लवी लाटकर, सुलक्षणा महाजन आदींनी मार्गदर्शन केलं. परंतु या सगळ्यात रचना संसदच्या एन्व्हार्यमेंटल




नुकतीच परिषद आयोजित केली होती. या परिषदेत देशभरातील ३०० आर्किटेक्ट्स व या शाखेचे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. केवळ सल्ले न देता हिलस्टेशन्सच्या विकासासाठी करायचा, या विषयात प्रावीण्य मिळवलेल्या आर्किटेक्ट्सनी विकास करताना सक्रीय सहभाग घ्यायचा, स्थानिक किंवा भूमिपुत्रांना या प्रक्रीयेत बरोबर घ्यायचं, पर्यावरणाचा समतोल राखताना अर्थकारणाचंही भान ठेवायचं, आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण माहिती सादर केली. शार्लेट लेक या एकमेव पाण्याचं स्त्रोत असलेल्या भागाचा विकास शास्त्रीय दृष्टीने कसा करता येईल याची या विद्यार्थ्यांनी मांडणी केली. पाणी हा जीवनस्त्रोत असल्याने व माथेरानसारख्या लाखो पर्यटकांची आवक असलेल्या ठिकाणी त्याचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पाण्याचे स्त्रोत जपणं व त्यांचा विकास करण्यावर या प्रेझेण्टेशनमध्ये भर देण्यात आला.

माथेरान इको-सेन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर झाला असल्याने सरकार हिलस्टेशन्सच्या विकासाबाबत सकारात्मक भूमिका घेत असल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. माथेरानसारख्या हिलस्टेशन्सचं वैशिष्ट्य अबाधित राखतानाच त्यांचा विकास करण्यासाठी क्लायमेट सेन्सिटिव्ह आर्किटेक्चरचा अवलंब करण्याबरोबरच, रेनवॉटर हार्व्हेस्टिंग, घनकचरा व्यवस्थापन, उर्जेची पुनर्निमिती करणाऱ्या उपायांचा अवलंब, बांधकामामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या सामानाचा वापर, जमिनीची धूप रोखण्यासाठी करण्याचे उपाय यावर या परिषदेत विस्तृत चर्चा करण्यात आली. परिषद यशस्वी करण्यासाठी कल्याण शाखेच्या दिलिप देशमुख, राजीव तायशेटे, पी. एस. गोखले, कौस्तुभ कुर्लेकर आदींनी विशेष मेहनत घेतल्याचं आयोजकांनी सांगितलं.

yogesh.mehendale@timesgroup.com

